स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १०/०२/२०१७

# मोटर सायकल चोर स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात - ०४ मोटर सायकल हस्तगत

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री संजय दराडे सो**, व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो** यांनी मोटर सायकल चोरीचे वाढते गुन्हयांचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करुन सुचना दिल्या होत्या. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी मोटर सायकल चोरीचे गुन्हे करणारे गुन्हेगारांची माहिती घेवुन वर्दळीचे ठिकाण, बाजारपेठ, बॅंक, हॉस्पिटल, लॉन्स व शहरातील मुख्य रस्त्यांवर पाळत ठेवुन मोटर सायकल चोरी केले जाते व सदर चोरीच्या मोटर सायकल हया कमी किंमतीत बनावट नंबर प्लेट तयार करुन विक्री केल्या जातात बाबत गोपनीय रित्या सविस्तर माहिती घेवुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास सतर्क पेट्रोलिंग करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक १० फेब्रुवारी २०१८ रोजी सायंकाळचे सुमारास **स्थानिक गुन्हे शाखेचे** पथकातील अधिकारी व कर्मचारी मोटर सायकल चोरणारे गुन्हेगारांचा शोध घेणेसाठी गस्त घालत असतांना **पोलीस निरीक्षक अशोक करपे** यांना मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे धुळे जिल्हयातील संशयीत इसम नामे **परशराम नानाजी बागुल, रा. शिवपाडा, ता.साक्री, जि.धुळे** हा मोटर सायकलींची चोरी करुन कमी किंमतीत विक्री करतो बाबत समजले वरुन पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यास पिंपळनेर परिसरातुन ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमास विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याचे कब्जातुन ०१ जांभळया रंगाची टि.व्ही.एस.स्टार, ०१ लाल रंगाची हिरो होण्डा पॅशन, ०२ काळे रंगाच्या हिरो होण्डा स्प्लेंडर अशा **एकुण ०४ मोटर सायकल** हस्तगत करण्यात आलेल्या आहे. ताब्यात घेतलेले वरील इसमाने सदर मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यांच्या नंबर प्लेट बनावट आहे. वरील जप्त करण्यात आलेल्या मोटर सायकल व आरोपीस पुढील तपासकामी जायखेडा पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले असुन अधिक तपास चालु आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे** यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा/नामदेव खैरणार, अशोक जगताप, सुधाकर खरोले, पोशि प्रदिप बहिरम, गणेश पवार अशा पथकाने सदर चोरीच्या मोटर सायकल हस्तगत करुन कामगिरी केली आहे.